**अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील, महामार्ग पोलीस गडचिरोली विभागाकरिता मंजूर असलेली पदे पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांकः एपीओ-२८२४/प्र.क्र.१६६/पोल-३**

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई.
दिनांक : १३ मार्च, २०२६.

<u>वाचा :-</u>

१) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/२६-ब/अपोमसं-वाहतुक/पदे वर्ग/७३/२०२४, दि.२६.०९.२०२४.

२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र पोलीस दलातील विविध वाहतूक शाखांकरिता पोलीस दलामधील विविध संवर्गातील एकूण २१४४ पदे निर्माण करण्यास शासन निर्णय दि. १७.०९.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच सदर २१४४ पदांचे शासन निर्णय दि.२२/११/२०१९ अन्वये पोलीस दलामधील विविध वाहतुक शाखांकरिता वाटप करण्यात आले असून, महामार्ग पोलीस गडचिरोली विभागाकरिता एकूण ३५ पदे वाटप करण्यात आलेली आहेत.

सदर महामार्ग पोलीस गडचिरोली विभागाकरिता वाटप केलेली ३५ पदे अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरुन, पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्याची विनंती पोलीस महासंचालक कार्यालयाने वाचा येथील संदर्भाधीन क्र.१ च्या पत्रांद्वारे शासनास केली होती. त्यानुसार अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील, महामार्ग पोलीस गडचिरोली विभागाकरिता मंजूर असलेली पदे पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्याची तसेच महामार्ग पोलीस, गडचिरोली विभाग बंद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील, महामार्ग पोलीस गडचिरोली विभागाकरिता मंजूर असलेली **"परिशिष्ट-अ"** मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण ३५ पदे पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांच्या आस्थापनेवर वर्ग करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सेवार्थ प्रणालीवर उपरोक्त ३५ पदे अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरुन कमी करण्यात यावीत.

३. तसेच, महामार्ग पोलीस, गडचिरोली विभाग बंद करुन सदर विभागाचे संपूर्ण कार्यक्षेत्र हे पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांचेकडे वर्ग करण्यात येत आहे.

४. उक्त शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.०२.०६.२०१५ व्दारे विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३१३१६०६३५५२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.03.13 16:07:36 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) पोलीस अधीक्षक, गडचिरोली.
८) अधिदान व लेखा अधिकारी, गडचिरोली.
९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, गडचिरोली.
१०) उप सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
११) वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
१२) निवड नस्ती, पोल-३.

शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक : एपिओ-२८२४/प्र.क्र.१६६/पोल-३
दिनांक : १३ मार्च, २०२६ चे सहपत्र.

**"परिशिष्ट-अ"**

**अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवरील, महामार्ग पोलीस गडचिरोली विभागाकरिता मंजूर असलेली पदे पोलीस अधीक्षक, गडचिरोली यांच्या आस्थापनेवर वर्ग करावयाची पदे.**

| **अ.क्र.** | **पदनाम** | **पदसंख्या** |
|---|---|---|
| १. | सहायक पोलीस निरीक्षक | ०१ |
| २. | पोलीस उप निरीक्षक | ०१ |
| ३. | सहायक पोलीस उप निरीक्षक | ०१ |
| ४. | पोलीस हवालदार | ०८ |
| ५. | पोलीस शिपाई | २१ |
| ६. | चालक पोलीस शिपाई | ०३ |
| **एकूण पदे** | | **३५** |